# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.०२.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक १८.०२.२००५ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील '' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी ४.१५ वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०६. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०७. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०८. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
०९. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१०. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
११. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१३. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१५. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१७. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
१९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२०. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२१. स.स.श्री.जबिंदा राजेंद्रसिंग तारासिंग
२२. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२३. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२४. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२५. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
२६. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२७. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
२८. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
२९. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३०. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३१. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३२. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३३. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब

३४. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
३५. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
३६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३७. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
३८. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
३९. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४०. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४१. स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४२. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
४३. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
४४. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
४५. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
४६. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
४७. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
४८. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
४९. स.स.श्री.अजिजखान गणीखान
५०. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
५१. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
५२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
५३. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५४. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०३. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**विषय क्र. ५७६ /१ :**

स्थायी समिती सभा दिनांक २७.०१.२००५ चा प्रस्ताव क्र.१९६ अन्वये सन २००५-२००६ या वर्षासाठी मालमत्ता कराचे दर निश्चित करणेच्या प्रस्तावास मान्यता देवून सर्वसाधारण सभेसाठी शिफारस केलेली आहे. प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तीय वर्ष सन २००५-२००६ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दिनांक २०/२/२००५ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे वित्तीय वर्ष सन २००५-२००६ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर खालील दर्शविल्याप्रमाणे कुठलाही बदल न करता निश्चित करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

| अ.क्र. | कराचे नांव | सन २००४-२००५ चे प्रचलित दर व सन २००५-२००६ साठी प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | करयोग्य मुल्य रूपये दर<br>१ ते १००० २३% | करयोग्य मुल्य रूपये दर<br>१ ते १००० २३% |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० ३०%<br>५०००१ ते १००००० ३४%<br>१००००० च्या पुढे ३६% | १००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० ३०%<br>५०००१ ते १००००० ३४%<br>१००००० च्या पुढे ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पुढे - १०% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पुढे - १०% |
| ३. | वृक्षकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% |
| ६. | पथकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% |
| ७. | जललाभ कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ८. | जलनि:सारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ९. मोकळ्या जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : सदर प्रस्तावावर अ.क्र.३ वर वृक्ष कर लावण्यांत आलेला आहे. प्रशासनाने खूलासा करावा की, कर योग्य मुल्यावर दोन टक्के वृक्ष कर लावण्या आलेला आहे ते बरोबर आहे का. व ते योग्य आहे का. व कोणत्या आधारे आकारण्यात येतो.

श्री.तकीहसन खान : अर्बन ट्री प्रिझर्वेशन ॲक्ट १९७५ या ॲक्ट मध्ये दिलेले आहे की, वृक्ष कर १ टक्के पेक्षा जास्त लावता येत नाही. त्यापेक्षा कमी करता येते. आपण दोन टक्के प्रस्तावित केलेले आहे, कायद्याच्या तरतूदीप्रमाणे ते १ % असावा अशी माझी माहिती आहे. मध्यतंरीच्या काळात १% वरून २% आकारणी झाली. वृक्ष करा बद्दल विद्यापीठाचे लेखा परिक्षणात अेजी नागपुर यांचेकडून आक्षेप नोंदविण्यांत आलेले होते. त्या संदर्भात महापालिकेला देखील पत्र देण्यांत आलेले आहे. यापूर्वीही मी, अर्धा टक्का वृक्ष कर असावा म्हणून सूचना केलेली होती, पून्हा २% करण्यांत आले. हे कायद्यानूसार बरोबर वाटत नाही. कायद्याच्या तरतूदी प्रमाणे ते दुरूस्त व्हावे. (तरतूदीची प्रत मा.महापौर यांना देतात.)

मा.आयुक्त : मालमत्ता करात कर योग्य मुल्यावर वृक्ष कर आकारणे बाबत स.सदस्यांनी उणीवा काढलेल्या आहेत, विभागाने या संदर्भात खूलासा करावा.

कर मुल्य नि.अ.-१ : करयोग्य मुल्यावर दोन टक्के वृक्ष कर लावलेले आहे, गेल्या वर्षी देखील दोन टक्के लावलेला होता. या संदर्भात कायद्यात काही दुरूस्ती आलेली आहे का, ते तपासून घेण्यांत येईल.

मा.महापौर : नियमात जी तरतूद असेल, तशी दुरूस्ती करून मंजूर करण्यांत येते.

श्री.प्रकाश निकाळजे : यामूळे एकूण किती रक्कम कमी होईल, याची माहिती घेण्यात यावी.

श्री.तकीहसन खान : यापूर्वी डॉ.भागवत कराड हे महापौर असतांना त्यावेळी कायद्याप्रमाणे दुरूस्ती करणेसाठी सूचविण्यांत आले होते, परंतू तशी दुरूस्ती झालेली दिसून येत नाही.

मा.महापौर : वृक्ष कर लावण्या संदर्भात कायद्यात जी तरतूद असेल, त्यास अधीन राहून वृक्ष कर लावण्यांत यावे. या दुरूस्ती सह प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार वृक्ष कर संदर्भात कायद्यातील तरतूदीनूसार वृक्ष कर लावणेच्या दुरूस्तीसह वित्तीय वर्ष सन २००५-२००६ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर खालील दर्शविल्याप्रमाणे वृक्ष करा संदर्भात दुरूस्ती केल्याप्रमाणे इतर कुठलाही बदल न करता निश्चित करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कराचे नांव | सन २००४-२००५ चे प्रचलित दर व सन २००५-२००६ साठी प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | करयोग्य मुल्य रूपये दर<br>१ ते १००० २३%<br>१००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० ३०%<br>५०००१ ते १००००० ३४%<br>१००००० च्या पुढे ३६% | करयोग्य मुल्य रूपये दर<br>१ ते १००० २३%<br>१००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० ३०%<br>५०००१ ते १००००० ३४%<br>१००००० च्या पुढे ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पुढे - १०% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पुढे - १०% |
| ३. | वृक्षकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% ऐवजी या संदर्भात असलेल्या कायद्याच्या तरतूदी प्रमाणे अनुज्ञेय होणारे कर. |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% |
| ६. | पथकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% |
| ७. | जललाभ कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ८. | जलनि:सारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर -१.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% |
| ९. मोकळया जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५७७ /२ :</u>**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-३, एन-४ भाग विकसीत होण्याच्या वेळेस म्हणजे साधारणत: २५ वर्षापूर्वी सिडको कार्यालयाने एन-४ अंतर्गत विविध सेक्टर मध्ये ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकलेली आहे. त्यानंतर सदरील भागाचा विकास होऊन घरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून, त्याच जलवाहिनीवर आता पर्यंत पाणी पुरवठा सुरू आहे. तथापी एन-४ भागात कमी दाबाने व पुरेशे पाणी मिळत नसल्याबद्दल तेथील नागरीकांच्या तक्रारी आहेत. त्यामूळे तेथील जुनी जलवाहिनी काढून नवीन १०० मी.मी.व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाची दरसूची सन २००४-०५ नुसार तयार करण्यात आले असून, त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,७८,६८८/- आहे. या कामासाठी लागणारा खर्च अर्थ संकल्प सन २००४-०५ मधील पृष्ठ क्रमांक १५२ अ.क्र.३३ वरील रूपये १०.०० लाख व अ.क्र.३४ वरील १०.०० लाख आणि अ.क्र.२७ वरील ब्लॉक बजेट रूपये २५.०० मधील रूपये ३,७८,६८८/- असा एकूण रूपये २३,७८,६८८/- असून, त्यास मा.सर्व साधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवणे साठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे.

करीता रक्कम रूपये २३,७८,६८८/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-३,एन-४ भागातील जूनी जलवाहिनी काढून नवीन १०० मी.मी.व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाची दरसूची सन २००४-०५ नुसार तयार करण्यात आले असून, त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २३,७८,६८८/- आहे. या कामासाठी लागणारा खर्च अर्थ संकल्प सन २००४-०५ मधील पृष्ठ क्रमांक १५२ अ.क्र.३३ वरील रूपये १०.०० लाख व अ.क्र.३४ वरील १०.०० लाख आणि अ.क्र.२७ वरील ब्लॉक बजेट रूपये २५.०० मधील रूपये ३,७८,६८८/- असा एकूण रूपये २३,७८,६८८/- चे अंदाजपत्रकास सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ''जण गण मन '' या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.

महापौर,
महानगरपालिका औरंगाबाद.